महाराष्ट्र टाइम्स
www.maharashtratimes.com
नोंदणी क्र. एमएच/एमआर/साउथ-१३/२००६-०८, आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. १२४९/ ६२.
मुंबई, सोमवार २१ जुले २००८
◆ पाने १४ ◆ शहर आवृत्ती * ◆ रुपये २.००

# दोषींवर कठोर कारवाईचं 'स्कोडा'चं आश्वासन

● मुंबई टाइम्स टीम

गाडीचे ओरिजिनल पार्ट्स काढून त्याजागी बनावट पार्ट्स लावल्याची केस 'स्कोडा'ने अत्यंत गांभीर्याने घेतली असून संबंधित ग्राहक आणि डीलर यांच्या परस्परविरोधी तक्रारींबद्दलचा पोलिस तपास पूर्ण झाल्यानंतर दोषींवर कडक कारवाई करू, असं



कंपनीतर्फे कळवण्यात आलंय.

जोवर गाडीच्या बनावट भागांचा तपास होत नाही तोवर कोणतीही पेमेण्ट न करता गाडी घेऊन जाण्याचा पर्यायही कंपनीने संबंधित ग्राहक हरीश कांचन यांना दिला होता आणि कन्झ्युमर कोर्टात जाण्याच्या नोटिशीलाही कंपनीने ११ जुलैला उत्तर पाठवलंय, असं कंपनीचं म्हटलं आहे. तर दुसरीकडे स्कोडाचं कोणतंही उत्तर आजतागायत आपल्याला मिळालं नसून नाइलाजाने १७ जुलैला आपण कोर्टात केस फाइल केल्याचा कांचन यांचा दावा आहे.

## ग्राहकाची कोर्टात धाव

पोलिस तपास सुरू असल्याने स्कोडाने तटस्थ भूमिका घेतली आहे. पण, डीलरच्या फसवेगिरीला कंटाळून आपण पोलिसांत तक्रार दाखल करेपर्यंत कंपनीने कोणतीही शहानिशा केली नसल्याचं कांचन यांचा आरोप आहे. शिवाय 'स्कोडा'च्या सांगण्यावरून वेगळ्या डीलरने गाडीचे बनावट पार्ट काढून बदलले. त्याच्या बिलापैकी निम्म्या रकमेचे दोन चेक फसवणूक करणाऱ्या डीलरने दिले. इथेच तो डीलर (न्युमरोन्स) दोषी असल्याचं आकळलं, असं कांचन म्हणाले.

'न्युमरोन्स'ला १ लाख १४ हजारचं बिल भरल्यानंतरच ती गाडी 'जेएमडी'मध्ये दाखल झाली. त्याअर्थी गाडीतील सर्व बनावट पार्ट्स कांचन यांचे होते. तरीही ते सर्व पार्ट्स कंपनीकडे देण्याऐवजी 'न्युमरोन्स'लाच परत देण्याचा आग्रह धरला गेला. आपण त्यास आक्षेप घेऊन सर्व पार्ट्स बनावट असल्याची रिसीट मागितली तरीही ती देण्यास नकार देण्यात आल्याचं कांचन यांनी सांगितलं. कंपनीने कोणतीही 'एनओसी' कांचन यांच्याकडे मागितली नसल्याचं कळवलं आहे, परंतु 'मुंबई टाइम्स'च्या प्रतिनिधीशी बोलताना मात्र कंपनीच्या 'पीआर'नेच तसं मान्य केलं होतं. ग्राहक या नात्याने एनओसी मागण्याचा प्रश्नच नसून आपल्याला गाडी हवी असल्याचं कांचन म्हणाले. २१ फेब्रुवारीला वर्कशॉपमध्ये गेलेली गाडी, कंपनीशी वारंवार संपर्क साधूनही पुन्हा ताब्यात न आल्याने आपण एक जुलैला पोलिसांत गेल्याचं कांचन यांनी स्पष्ट केलं.

mumbaitimes@indiatimes.com